**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८१/२०२०** **दिनांक ०९/१०/२०२०** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०३/१०/२०२० ते ०९/१०/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १०/१०/२०२० सकाळी ८:३० पासून १४/१०/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३/१० | ०४/१० | ०५/१० | ०६/१० | ०७/१० | ०८/१० | ०९/१० | | १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | १४/१० |
| ०.० | १७.२ | ०.० | ०.० | - | - | - | पाऊस (मिमी) | ४ | ० | ० | १ | २ |
| ३२.८ | ३३.० | ३२.६ | ३३.० | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३६ | ३४ | ३७ | ३७ |
| २३.८ | २४.२ | २३.८ | २४.८ | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २७ | २७ | २६ | २६ | २७ |
| ५ | ४ | ४ | ३ | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ८३ | ८६ | ८९ | ८७ | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७५ | ७६ | ९२ | ९५ | ९४ |
| ८० | ७४ | ७८ | ७८ | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ५१ | ४७ | ५१ | ७२ | ७२ |
| १.९ | ०.० | १.९ | ०.० | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ३ | ८ | ५ | ५ |
| प. | शांत | प. | शांत | - | - | - | वाऱ्याची दिशा | पू. | द. | द. | द. | द. |

**हवामान सारांश**

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार ठाणे जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी दिनांक १० ते १४ ऑक्टोबर, २०२० दरम्यान हलक्या ते खूप हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश ढगाळ राहील.** |
| **इशारा** | **दिनांक ९ ते १३ ऑक्टोबर, २०२० दरम्यान ठाणे जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.** |
| **पाऊसाचा विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक १४ ते २० ऑक्टोबर, २०२० दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची शक्यता आहे.** |

| पिक | अवस्था | हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **दाणे भरणे अवस्था (गरव्या जाती), दाणे भरणे ते पक्वता अवस्था (निमगरव्या जाती) आणि पक्वता अवस्था (हळव्या जाती)** | • हवामान अंदाजानुसार हलक्या पाऊसाची शक्यता असून परतीच्या पाउसाच्या कालावधीत सर्वसाधारणपणे संध्याकाळी पाऊस पडण्याची शक्यता असते यासाठी तयार झालेल्या भात पिकाची कापणी सकाळच्या वेळेस "वैभव" विळ्याच्या सहाय्याने जमिनीलगत करून लगेचच मळणी करावी आणि उत्पादीत पिक कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे.<br>• आभासमय काजळी या बुरशीजन्य रोगामुळे भाताच्या लोंब्याचे रूपांतर काळसर हिरव्या रंगाच्या मखमली गाठींमध्ये होवून लोंबीतील काही दाणेच रोगग्रस्त होतात. अशा प्रकारे गाठी दिसून येत असल्यास भात कापणी पूर्वी अशा लोंब्या गोळा करून नष्ट कराव्यात.<br>• पिकाची कापणी जमिनीलगत करावी तसेच कापणीनंतर शेताची नांगरट करून धस्कटे काढून नष्ट करावीत. यामुळे पुढील हंगामात खोड किड आणि निळे भुंगेरे याचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल.<br>• गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. नियंत्रित करावी. तसेच निम गरवे भात पक्व झाले असल्यास कापणीपूर्वी ८ ते १० दिवस खाचरातील पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• पाऊसाची उघडझाप आणि तापमानात वाढ संभवत असल्याने माळजमिनीवर असलेल्या हळव्या जातीच्या भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने तयार झालेल्या हळव्या भात पिकाची त्वरित कापणी करावी. तसेच भात कापणी नंतर जमिनीची खोल नांगरणी करावी त्यामुळे किडीचे सुप्तावस्थेतील कोष नष्ट होण्यास मदत होईल. |
| **नागली (नाचणी)** | **दाणे भरणे ते पक्वता** | • हवामान अंदाजानुसार हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने कापणीस तयार झालेल्या नागली पिकाची कणसे सकाळच्या वेळेस विळ्याने कापून कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे आणि वाळल्या नंतर मळणी करावी. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • हवामान अंदाजानुसार पाऊसाची उघडझाप आणि तापमानात वाढ संभवत असल्याने आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण आहे. यामुळे नवीन येणाऱ्या पालवीचे तुडतुडे आणि मिज माशीच्या प्रादुर्भावापासून संरक्षण करण्यासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही ९ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आंबा बागेतील गवत, रोगग्रस्त फांद्या काढून बागेची साफसफाई करावी आणि नंतर कीटकनाशकाची फवारणी घ्यावी.<br>• आंब्याला मोहोर येण्यासाठी झाडाच्या मुळांना ताण बसणे आवशक्य असते. यासाठी बागेतील गवत काढून बागेची साफसफाई लवकरात लवकर पूर्ण करावी जेणे करून आंबा बागेतील जमिनीमध्ये असलेले पाण्याचे प्रमाण लवकर कमी होवून झाडाला ताण बसण्यास मदत होईल.<br>• वाढते तापमान, पावसाळ्याच्या तुलनेने कमी होणारी आर्द्रता, जमिनीत उपलब्ध असलेला ओलावा जुन्या अनुत्पादित आणि घन लागवड केलेल्या आंबा कलमांची छाटणी करण्यास उत्तम आहे. घन लागवड (५ **x** ५ मी. किंवा ६ **x** ४ मी.) |

| | | |
|---|---|---|
| | | असलेल्या आंबा बागांमध्ये सुरुवातीच्या काळापासून नियमित छाटणी करावी. या मध्ये उंची कमी करणे, फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास छाटणे आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकणे या गोष्टींचा अंतर्भाव करावा. घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी.<br>• पारंपारिक पध्दतीने लागवड केलेल्या आंबा बागेमध्ये जुन्या अनुत्पादित झाडांची मध्य फांदी छाटणी व इतर मध्यम फांद्यांची विरळणी करावी. खूप जुन्या आणि उंच झाडांची छाटणी बुंध्यापासून दोन तृतीयांश उंचीवर करावी व कमी वयाच्या आणि कमी उंचीच्या झाडांची छाटणी १२ ते १५ फुट उंचीवर करावी. छाटणी केलेल्या झाडांवर क्लोरोपायरीफॉस कीटकनाशक ५ मि. ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणात संपूर्ण झाडावर फवारून झाड भिजवून घ्यावे तसेच कीटकनाशकाचे द्रावण छाटणी केलेल्या झाडांच्या मुळांमध्ये देखील ओतावे. त्यानंतर १ लिटर डांबराच्या द्रावणामध्ये ५ ग्रॅम बाविस्टीनची भुकटी मिसळून कापलेल्या फांद्यांच्या भागावर लावावे. छाटणी केल्यानंतर सुरुवातीच्या काळात झाडाला १० ते १५ दिवसांच्या अंतराने १५० ते २०० लिटर पाणी द्यावे. नवीन फुटवे आल्यानंतर दोन आठवड्यांनी ३ ते ५ फुटवे ठेवून नवीन फुटव्यांची विरळणी करावी. पहिली विरळणी केल्यानंतर, छाटणी केलेल्या भागापासून खाली फुटवे येण्यास सुरवात झाल्यावर दर एक फुटावर एक याप्रमाणे खोडाच्या सर्व बाजूला फुटवे ठेवून इतर फुटवे काढून टाकावेत. |
| **नारळ** | **फळधारणा** | • पाऊसाची उघडझाप आणि तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ बागेत तसेच पूर्ण वाढलेल्या माडांना पाणी देण्याची व्यवस्था करावी. आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाची सोंडणे पुरावीत.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची वाढत्या उन्हामुळे पाने करपू नये म्हणून पहिली दोन वर्षे रोपांना वरून सावली करावी.<br>• नारळावरील इरीओफाईड कोळीच्या प्रादुर्भावामुळे फळाच्या देठाखालच्या भागात पांढरट, पिवळे, त्रिकोणी चट्टे दिसून येतात व नंतर चट्टे वाढत जाऊन त्रिकोणी आकाराचे होतात. प्रादुर्भित भागावरील फळांचे आवरण तडकते परिणामी नारळ लहान राहतात तसेच लहान फळांची गळ होते. किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के कडुनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. समप्रमाणात पाण्यात मिसळून मुळाद्वारे ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत. याशिवाय नारळावर १ टक्का कडुनिंबयुक्त कीटकनाशक (निमाझोल) ४ मि. ली. प्रतीलिटर पाण्यातून नारळाच्या घडावर पडेल अशी फवारणी करावी. फवारणी करण्यापूर्वी सर्व किडग्रस्त व तयार नारळ काढून घ्यावेत. पडलेले फळे, फुलोरा गोळा करून नष्ट करावेत. |
| **चिकू** | **फळधारणा** | • पाऊसाची उघडझाप आणि तापमानात वाढ संभवत असल्याने चिकू बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• चिकू बागांची गवत काढून साफसफाई करावी. वाळलेल्या, मृत आणि अशक्त फांद्या कापून विरळणी करावी व कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावी तसेच १ टक्के बोर्डोमिश्रणाची संपूर्ण झाडावर फवारणी करावी.<br>• चिकूवर बी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी चिकू बागेतील किडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे व पालापाचोळा गोळा करून नष्ट करावीत व बागेची स्वच्छता राखून बागेत पूरेसा सूर्यप्रकाश येईल असे पहावे. तसेच ५० टक्के प्रवाही प्रोफेनोफोस १५ मि. ली. किंवा १४.५ टक्के प्रवाही इंडोक्झाकार्ब ५ मि.ली किंवा २.८ टक्के प्रवाही डेल्टामेथ्रीन १० मि. ली. कीटकनाशकंची आलटून पालटून प्रति १० लिटर पाण्यातून पहिली फवारणी करावी. पुढील दोन फवारण्या एक महिन्याच्या अंतराने कराव्यात. किडीच्या सर्वेक्षणासाठी निळ्या रंगाच्या प्रकाशसापळा बागेत बसवावा. |
| **भेंडी** | **पूर्व तयारी** | • भेंडी पिकाच्या लागवडीसाठी जमिनीच्या मशागतीची कामे सुरु करावीत. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | **-** | • क्रायमिन कॉंगो हेमोरायजिक फिवर या विषाणूजन्य रोगाचा प्रसार जनावरांना गोचीडापासून होण्याची शक्यता असल्याने जनावरांच्या गोठ्यात स्वच्छता राखावी तसेच गोचीड नियंत्रणासाठी पशू वैद्यकांचा सल्ला घेवून उपाय योजना कराव्यात.<br>• फुलोऱ्यावर असलेल्या हिरवा चाऱ्याची मुरघास पद्धतीने साठवण करावी. यासाठी प्रत्येकी १०० किलो बारीक तुकडे केलेल्या गवतावर ५ ते ६ लिटर पाण्यामध्ये तयार केलेले द्रावण (२ कि. गूळ + अर्धा कि. युरिया + १ कि. मीठ) शिपडावे. प्रक्रिया केलेल्या गवताचे थर रचून बाजारात सहज उपलब्ध असलेल्या प्लास्टिक सायलो पूर्ण भरावेत. पाउस आणि उष्णते पासून संरक्षणासाठी सायलो शेड मध्ये ठेवावेत. अशा पद्धतीने २-३ महिन्यामध्ये मुरघास जनावरांना खाण्यासाठी तयार होतो. |
| **कुकुटपालन** | **-** | • मांसासाठी आणि अंडी उत्पादनासाठी नवीन पक्षी पाळण्यासाठी योग्य कालावधी असल्याने पिल्लांची उपलब्धता करावी. पिल्ले अंड्यातून बाहेर पडल्यानंतर सहाव्या आठवड्यापर्यंत त्यांना योग्य तापमानाची आणि संरक्षणाची गरज असते त्यासाठी पिल्ले आणावयाच्या आधी ब्रुडर तयार करून ठेवावे. ब्रुडरचे तापमान साधारणत: ३० ते ३५ अंश सेल्शियस असे ठेवावे. पिल्ले आणल्यावर त्यांना ब्रुडर मध्ये ठेवून पसरट भांड्यामध्ये भरडलेला मका द्यावा तसेच पाण्याचे पसरट भांडे ठेवावे. |

**टिप: पाऊसाची उघडीप असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**